


॥ अहर्निश ग्रामसेवा ॥

'' ग्रामपंचायत हाच ग्रामविकासाचा मुलभुत पाया आहे.''

# ग्रामपंचायत वढू बुद्रूक

(संभाजीनगर), ता. शिरूर, जि. पुणे-४१२ २१६.

ईमेल : grampanchayatwadhubudruk@gmail.com





✲ ग्रामपंचायत कराची रक्कम मुदतीत भरुन सहकार्य करा.
✲ घर तिथे शौचालय बांधा, कुटुंबाचे आरोग्य राखा.
✲ स्थानिक जन्म, मृत्यू नोंद २१ दिवसात ग्रामपंचायतकडे करा.
✲ झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण संतुलन ठेवा.

**श्री. शंकर बाळासाहेब भाकरे**
ग्रामविकास अधिकारी

**श्री. राहुल मारुती ओव्हाळे**
उपसरपंच
मो. 9511605509

**सौ. अंजली प्रफुल्ल शिवले**
सरपंच
मो. 9697037799


ग्रामपंचायत वढू बुद्रुक, ता. शिरूर, जि. पुणे
जा.क्र.: ९०४
दि.:

दिनांक : १५ / ०३ / २०२४

प्रति,

मा. प्राचार्य,
मराठवाडा मित्र मंडळाचे,
इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,
लोहगाव, पुणे -४७.

स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या वढू बुद्रुक गावाच्या भूमीत मराठवाडा मित्र मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, लोहगाव येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर दि. २५.०१.२०२४ ते ३१.०१.२०२४ या कालावधीत संपन्न झाले. सर्वात प्रथम मी वढू गाव व सर्व ग्रामस्थांच्या वतीने सर्व शिबिरार्थी विद्यार्थी, त्यांचे मार्गदर्शन शिक्षक, आपल्या संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी यांचे शिबिराच्या यशस्वी आयोजनबद्दल अभिनंदन करते.

आपल्या विद्यार्थ्यांनी शिबिराची सुरुवात "मतदान हा माझा हक्क" या विषयांवर पथनाट्य केले. स्वच्छ भारत अभियानांतर्गत गावात विविध ठिकाणी (दशक्रिया घाट, श्रीराम मंदिर, स्मशाभूमी, धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज समाधी स्थळ, ग्रामदैवत भैरवनाथ मंदिर इ.) स्वच्छता करण्यात आली. आपल्या शिबिरांतर्गत आपण वृक्षरोपण आणि वृक्षसंवर्धन, मुलांचे खेळ, महिलांचे खेळ, 'मंथन स्पर्धा परीक्षा' अंतर्गत विद्यार्थी मार्गदर्शन, ज्येष्ठ मंडळींसाठी भजन व किर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम, योगा व ध्यान, "स्वराज्य ते सुराज्य" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.




॥ अहर्निश ग्रामसेवा ॥

'' ग्रामपंचायत हाच ग्रामविकासाचा मुलभुत पाया आहे.''

# ग्रामपंचायत वढू बुद्रूक

(संभाजीनगर), ता. शिरुर, जि. पुणे-४१२ २१६.

ईमेल : grampanchayatwadhubudruk@gmail.com




* ग्रामपंचायत कराची रक्कम मुदतीत भरुन सहकार्य करा.
* घर तिथे शौचालय बांधा, कुटुंबाचे आरोग्य राखा.
* स्थानिक जन्म, मृत्यू नोंद २१ दिवसात ग्रामपंचायतकडे करा.
* झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण संतुलन ठेवा.


**श्री. शंकर बाळासाहेब भाकरे**
ग्रामविकास अधिकारी

**श्री. राहुल मारुती ओव्हाळे**
उपसरपंच
मो. 9511605509

**सौ. अंजली प्रफुल्ल शिवले**
सरपंच
मो. 9697037799


ग्रामपंचायत वढू बु्।. ता.शिरुर,जि.पुणे
जा.क्र.:
दि.:

दिनांक : / / 20

आपल्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या शिबिराच्या कामाचे स्वरूप पाहून आमच्या ग्रामपंचायत वढू बुद्रुकतर्फे धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांची प्रतिमा आपल्या राष्ट्रीय सेवा योजना एककला सप्रेम भेट देण्यात आली आहे. सदरची प्रतिमा आपण आपल्या महाविद्यालयात दर्शनीय ठिकाणी स्थापित करावी, जेणेकरून आपल्या विद्यार्थ्यांवर अतिशय चांगले संस्कार होतील व त्यांना धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या कार्याची प्रेरणा प्राप्त होईल.

पुन्हा एकदा आपण आपले शिबिर यशस्वीरित्या पूर्ण केली त्याबद्दल आपले अभिनंदन करते व पुढील वर्षी आपल्या शिबिरासाठी आमच्या गावात येण्यासाठी आमंत्रित करते.

सरपंच
ग्रामपंचायत वढु बु्।.
ता.शिरुर,जि.पुणे